**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# प्रसिद्धी विभाग

# शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## मराठी विभाग – वाचन संकल्प महाराष्ट्राचा



लोकमत

### प्रबोधनासाठी वाचनसंस्कृती आवश्यक : डॉ. संजय शिंदे

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : वाचनसंस्कृतीच्या विकासाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे भरणपोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते म्हणून विद्यार्थ्यांनी अधिकाधिक अवांतर वाचनातून वाचनसंस्कृती विकसित करावी व नवीन वर्षात वाचन संकल्प करावा, असे आवाहन उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमातंर्गत सामूहिक वाचन व एकदिवसीय वाचनकौशल्य कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. राजेंद्र शिरसी, डॉ. बाळासाहेब अनुसे, ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर, प्रा. रौनक भिसे उपस्थित होत्या. डॉ. संजय शिंदे म्हणाले की, वाचन हे सर्वांसाठी अतिशय आवश्यक असे कौशल्य आहे. या कार्यशाळेत डॉ. शिंदे यांनी वाचन कौशल्यासंदर्भातील मूलभूत संकल्पना विद्यार्थ्यांना सांगितल्या. पुस्तक प्रदर्शन, वाचन संवाद व पुस्तक परीक्षण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रा. रौनक भिसे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Jan 02, 2025
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# सामाजिक प्रबोधनासाठी वाचनसंस्कृती आवश्यक : डॉ. संजय शिंदे

## राजगुरू महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम

**खेड : पुढारी वृत्तसेवा**

वाचनसंस्कृतीच्या विकासाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे भरणपोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते; म्हणून विद्यार्थ्यांनी अधिकाधिक अवांतर वाचनातून वाचनसंस्कृती विकसित करावी व नवीन वर्षात वाचन संकल्प करावा, असे आवाहन हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत बुधवारी (दि. १) सामूहिक वाचन व एकदिवसीय वाचनकौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्या वेळी डॉ. शिंदे बोलत होते. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. राजेंद्र शिरसी, ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर आदी या वेळी उपस्थित होते.

'सामूहिक वाचन' या उपक्रमात विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीनुसार पुस्तके वाचली. मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने



वाचनकौशल्य कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. संजय शिंदे.

१ ते १५ जानेवारी यादरम्यान वाचन पंधरवडा उपक्रम राबविण्यात येणार आहे. पुस्तक प्रदर्शन, वाचनसंवाद व पुस्तक परीक्षण स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले आहे. सूत्रसंचालन प्रा. रौनक भिसे यांनी केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Jan 02, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

केसरी

# समाज प्रबोधनासाठी वाचनसंस्कृती आवश्यक : डॉ. संजय शिंदे

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** वाचनसंस्कृतीच्या विकासाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होते. यामुळे सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. म्हणून विद्यार्थ्यांनी अधिकाधिक अवांतर वाचनातून वाचनसंस्कृती विकसित करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत सामूहिक वाचन व कौशल्य कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.




या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. राजेंद्र शिरसी, डॉ. बाळासाहेब अनुसे, ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर, प्रा. रौनक भिसे उपस्थित होत्या.

डॉ. संजय शिंदे म्हणाले, वाचन हे सर्वांसाठी अतिशय आवश्यक आहे. वाचन कौशल्य संपादित केल्यास कमी वेळात प्रभावी अभ्यास करता येतो. योग्य मार्गाने सतत सराव केल्यास आपण कार्यक्षम वाचक होऊ शकतो. या कार्यशाळेत डॉ. शिंदे यांनी वाचन कौशल्यासंदर्भातील मूलभूत संकल्पना विद्यार्थ्यांना सांगितल्या.

मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने १ ते १५ जानेवारी दरम्यान वाचन पंधरवडा उपक्रम राबविण्यात येणार असून, पुस्तक प्रदर्शन, वाचन संवाद, पुस्तक परिक्षण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रौनक भिसे तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

दैनिक आरंभपर्व

06 Jan 2025 - Page 4



## राजगुरू महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम

### सामाजिक प्रबोधनासाठी वाचनसंस्कृती आवश्यक - डॉ. संजय शिंदे

राजगुरुनगर (दै. आरंभपर्व) [illegible]

HRM

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख